मौजे दापचरी ता.डहाणू जि. पालघर येथील दुग्ध प्रकल्पाची जमीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषि बाजार उभारणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामुल्य देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पणन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: कृबास-०१२५/प्र.क्र.२०७/२१-स,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- २२ जुलै, २०२६

संदर्भ - १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्र. कृबास-०१२५/प्र.क्र.२०७/२१-स दि.१३ ऑगस्ट, २०२५
२.महाराष्ट्र राज्य पणन मंडळ , पुणे यांचे दि.४.९.२०२५ चे पत्र.
३.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पालघर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.जिउनि/पालघर/ सल्ला.समि.अहवाल/१५८२/सन-२०२५, दि.२९.९.२०२५

प्रस्तावना:-

वाढवण बंदर हा महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात विकसित केला जाणारा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. तिथे भारतातील सर्वात मोठे बंदर आणि नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी करुन वाढवण प्रदेश चौथी मुंबई म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

पालघर जिल्ह्यात नजीकच्या काळात वाढवण येथे लॉजिस्टिक आणि गोदाम विकास केंद्रावर आधारित विकसित होणारी चौथी मुंबई तसेच, वाढवण बंदराच्या कृती योजनेमध्ये दापचारी येथे टर्मिनल मार्केट ,कोल्ड चेन लाइव्ह, निर्यात पॅकहाऊस निर्माण करण्याचा समावेश विचारात घेता, वाढवण बंदरापासून नजिकच्या मध्यवर्ती ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषि बाजाराची उभारणी झाल्यास, राष्ट्रीय व राज्य पातळीवर अर्थव्यवस्थेस चालना मिळेल तसेच शेतकरी, व्यापारी व ग्राहक यांच्या सोईचे होईल. सदर बाब लक्षात घेता, रुंगीस, फ्रान्स येथे ज्याप्रमाणे ताज्या उत्पादनाचे जगातले सर्वात मोठे मॉर्डन होलसेल मार्केट SEMMARIS कंपनीचे उभारण्यात आले आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराजवळील मौजे दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराची उभारणी करण्यासाठी तथा अनुषंगीक पणन विषयक सुविधा निर्माण करण्यासाठी शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या दापचरी दुग्ध प्रकल्पाची जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास मिळणेसाठी जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र.१ येथील दि.१३ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयान्वये सल्लागार समिती स्थापन करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी पालघर यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन सल्लागार समितीने संदर्भ क्र.३ येथील दि.२९.९.२०२५ च्या पत्रान्वये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराची उभारणी करणेकरीता पणन मंडळास दापचरी प्रकल्पाची क्षेत्र ५५८ हे. ४३ आर. जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शिफारस केली आहे.

याबाबतचा मंत्रीमंडळ प्रस्ताव दि.१४ जुलै,२०२६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार मौजे दापचरी ता.डहाणू जि.पालघर येथील पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या दापचारी दुग्ध प्रकल्पाची ५५८ हे. ४३ आर. जमीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराची उभारणी करणेकरीता तथा अनुषंगीक पणन विषयक सुविधा निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

रुंगीस, फ्रान्स येथे ज्याप्रमाणे ताज्या उत्पादनाचे जगातले सर्वात मोठे मॉर्डन होलसेल मार्केट SEMMARIS कंपनीचे उभारण्यात आले आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराजवळील मौजे दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराची उभारणी करण्यासाठी तथा अनुषंगीक पणन विषयक सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शिफारस केलेली, मौजे दापचरी ता.डहाणू जि.पालघर येथील पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या दापचारी दुग्ध प्रकल्पाची खालीलप्रमाणे एकूण ५५८ हे. ४३ आर. जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशील	क्षेत्र (हे.आर)
१.	महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, ठाणे (MIDC) ला देऊन शिल्लक राहिलेले क्षेत्र	८२.७४
२.	कायमस्वरूपी प्रत्यार्पित करावयाची क्षेत्रापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांना प्रत्यार्पित केलेले क्षेत्र	२०६.०८
३.	कायमस्वरूपी प्रत्यार्पित करावयाची क्षेत्रापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांना प्रत्यार्पित करावयाचे शिल्लक क्षेत्र	२४१.२१
४.	राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४८ च्या पूर्वेकडील व २४१.२१ हे.च्या उत्तरेकडील लगतचे क्षेत्र	२८.४०
	एकूण	५५८.४३

२. सदर शासन निर्णय पशु, दुग्ध व मत्स्य विकास विभागाने त्यांच्या प्र.क्र.११५/२०२५/ई-१४५१४०१ /२०२६ /पदुम-१०, दि.५.६.२०२६ च्या टिप्पणी अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार, महसूल व

वन विभाग/भूसंपादन-०२ यांनी दि.२९.५.२०२६ च्या टिप्पणी अन्वये दिलेल्या सहमतीनुसार, वित्त विभागाने त्यांच्या अनौ.सं.क्र. ३९१/२०२६ /व्यय-२, दि.९.६.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार तसेच, मंत्रीमंडळाच्या दि. १४.०७.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७२२१६१७४९५८५६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN CHINDHU DARADE
Date: 2026.07.22 16:18:53 +05'30'

(प्रवीण दराडे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री (क्रीडा, अल्पसंख्यांक व राऊशु) यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव
४. मा. मंत्री (पणन), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (पदुम), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री(महसूल), महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव,(महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव, पशु, दुग्ध व मत्स्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.जिल्हाधिकारी, पालघर.
१३.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
१५.उपविभागीय अधिकारी, डहाणू, जि.पालघर.
१६.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर
१७.सहायक आयुक्त, दुग्ध पशुसंवर्धन पालघर
१८. जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, पालघर
१९.जिल्हा अधिक्षक,भूमी अभिलेख, पालघर
२०.प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ , ठाणे
२१.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पालघर
२२.प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी, ता.डहाणू
२३.निवडनस्ती.